# Lok Mahavidyalaya, Wardha  Session 2018-19
# Study Material
# Class – B.A. II (IV semester)  Economics
# Sub :- Macro Economics

---

# केंद्रिय अधिकोष व त्याची भूमिका व कार्ये
# Functions of Central Bank

**प्रस्तावना** :- प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेत अधिकोष अत्यंत महत्त्वाची भूमिका वठवित असतात. समाजातील बहुसंख्य लोकांजवळ असणारा काही पैसा त्यांना आज आवश्यक नसतो. परंतु भविष्यकालीन गरजांसाठी तो सुरक्षित ठेवायचा असतो. सुरक्षिततेची तसेच व्याजाच्या स्वरूपात स्विकारीत असतात. त्यानंतर ठेवीतील हाच पैसा समाजातील विविध प्रकारच्या उद्योजकांना थोडया जास्तीच्या व्याजाच्या दराने अधिकोषाद्वारे कर्जाऊ दिला जातो. त्यामुळे अधिकोषाचा, ठेवीदारांचा तसेच कर्जदारांचा सुध्दा फायदा होतो. समाजात रोजगारीच्या संधी निर्माण होतात आणि आर्थिक विकास घडून येतो.

ठेवीच्या स्वरूपात असणाऱ्या पैशाच्या आधारावर अधिकोष प्रत्यय निर्मिती सुध्दा करीत असतात. अशाप्रकारे कार्यरत असणाऱ्या विविध व्यापारी अधिकोषांना नियंत्रण ठेवण्यासाठी आणि त्यांच्या कार्यरत असणाऱ्या विविध व्यापारी अधिकोषांना नियंत्रण ठेवण्यासाठी आणि त्यांच्या कार्यात सूसुत्रता आणून समन्वय प्रस्थापित करण्यासाठी एका केंद्रिय अधिकोषाची आवश्यकता असते. भारतात “रिझर्व बॅक ऑफ इंडिया” (RBI) हा केंद्रिय अधिकोष आहे. देशाच्या संतुलीत आर्थिक विकासाठी योग्य अशा आर्थिक धोरणांची आखणी आणि अंमलबजावणी करण्याचे कार्य केंद्रिय अधिकोष करीत असतो. देशाच्या हितासाठी आणि विकासाठी असणाऱ्या  विविध योजना केद्रिय अधिकोष इतर सर्व अधिकोषांद्वारे राबवित असतो. या दृष्टिने देशाच्या अधिकोषण व्यवस्थेत केंद्रिय अधिकोषाचे स्थान अत्यंत महत्वपूर्ण असते.

## केंद्रिय अधिकोषांचा विकास :-

पहिल्या महायुध्दानंतर १९२० मध्ये ब्रुसेल्स या शहरात आंतरराष्ट्रीय मौद्रिक परिषदेत ज्या देशांनी अद्यापी केंद्रिय अधिकोष स्थापन केले नसतील त्यांनी ते करावेत अशा प्रकारची शिफारस करण्यात आली. त्यानुसार विविध देशांमधून केंद्रिय अधिकोषांची स्थापना करण्यात आली. भारतात ०१ एप्रिल १९३५ मध्ये “रिझर्व बॅक ऑफ इंडिया” (RBI) या केंद्रिय अधिकोषाची स्थापना करण्यात आली. बॅक ऑफ इंग्लंड हा सर्वात जुना केंद्रिय अधिकोष असून त्याची स्थापना इ.स. १६९४ मध्ये झाली असली तरी खऱ्या अर्थाने इ.स. १८४४ मध्ये त्याने केंद्रिय अधिकोषाची कार्ये करण्यास सुरवात केली. देशाच्या अर्थव्यवस्थेला विकासाची दिशा देण्याचे महत्वाचे कार्य केंद्रिय अधिकोषाला करावे लागते. व्यापारी अधिकोषाची कार्ये

देशासाठी लाभदायक ठरेल अशाप्रकारे केंद्रिय अधिकोषाला त्यांचे नियंत्रण करावे लागते. आधुनिक काळात देशाच्या विकासाच्या स्तराला टिकवून ठेवण्यासाठी योग्य मौद्रिक धोरण राबविण्याची जबाबदारी केंद्रिय अधिकोषाची असते.”

## केंद्रिय अधिकोषाची व्याख्या (Defination’s of Central Bank):–

निरनिराळया अर्थशास्त्रज्ञांनी केंद्रिय अधिकोषाच्या निरनिराळया व्याख्या केल्या आहेत. या सर्व व्याख्या प्रामुख्याने केंद्रिय अधिकोषांच्या कार्यावर आधारित आहेत. त्यापैकी काही महत्वपूर्ण व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

१) प्रा. शॉ यांच्या मते, “देशातील प्रत्यय मुद्रेवर नियंत्रण ठेवणाऱ्या अधिकोषाला केंद्रिय अधिकोष असे म्हणतात.”

२) प्रा. हॉट्रे यांच्या मते, “अधिकोषांचा अधिकोष आणि अधिकोषांसाठी अंतिम ॠणदात्याचे कार्य करणाऱ्या अधिकोषाला केंद्रिय अधिकोष असे म्हणतात.”

३) डी. कॉक. यांच्या मतानुसार, “देशाच्या मौद्रिक आणि अधिकोषण व्यवस्थेच्या केंद्रस्थानी असलेला आणि देशाचे अंतिम हित विचारात घेऊन पुढील कार्ये करणाऱ्या अधिकोषाला केंद्रिय अधिकोष असे म्हणतात.”

## वैशिष्टये :–

१) देशातील व्यापार आणि जनतेच्या गरजा लक्षात घेऊन मुद्रेचे नियमन करणे

२) सरकारला साधारण अधिकोषण विषयक सेवा प्रदान करणे

३) व्यापारी अधिकोषाच्या रोख रकमांचे संरक्षण करणे

४) राष्ट्रातील विदेशी मुद्रा कोषांचे संरक्षण आणि नियमन करणे

५) व्यापारी अधिकोषांच्या आणि इतर वित्तीय संस्थांच्या हुंडयांचे पुनर्वसन करणे

६) अंतिम ॠणदात्याच्या स्वरूपात अधिकोषांना कर्ज देणे.


७) समाशोधनांचे कार्य करणे

८) सरकारचे औद्योगिक आणि मौद्रिक धोरण लक्षात घेऊन प्रत्यय मुद्रांचे नियंत्रण करणे इत्यादी.

अशाप्रकारे डी. कॉक यांच्या व्याख्येत केंद्रिय अधिकोषाला कराव्या लागणाऱ्या सर्व कार्याचा उल्लेख आहे त्यामुळे ही व्याख्या अधिक व्यापक समजली जाते.

## केंद्रिय अधिकोषांची उद्दिष्टये :-

केंद्रिय अधिकोषांची स्थापना पुढील उद्दिष्टाकरीता करण्यात आलेली आहे.




### १) पत्रमुद्रेचे संचालन :-

केंद्रिय अधिकोषाच्या स्थापनेपूर्वी पत्रमुद्रा संचालनाचे कार्य केंद्र सरकार स्वत: करीत असे परंतु केंद्रिय अधिकोषाच्या स्थापनेनंतर पत्रमुद्रेचे संचालन करण्याचे काम केंद्रिय अधिकोषाकडे सोपविण्यात आले. म्हणजेच पत्रमुद्रेचे संचालन करणे हाच केंद्रिय अधिकोषाच्या स्थापनेमागील प्रमुख उद्देश होय असे म्हणता येईल.

### २) मौद्रिक व्यवहारासंबंधी तथ्य गोळा करणे :-

देशाच्या अर्थव्यवस्थेसंबंधी महत्वपूर्ण अशी तथ्ये गोळा करून त्याद्वारे आर्थिक व मौद्रिक धोरण निश्चित करण्याकरिता सरकारला बरेच सहकार्य होते. अशी तथ्य संकलीत करणे व अर्थव्यवस्थेला धोरणात्मक साहय करणे हा देखील केंद्रिय अधिकोषाचा प्रमुख हेतु असतो.

### ३) समाशोधनाची व्यवस्था :-

व्यापारी अधिकोषाचे ग्राहक इतर अधिकोषांवर काढलेले धनादेश किंवा अधिकोष विकर्ष आपल्या अधिकोषातील खात्यात जमा करतात त्यातून परस्पर देणी घेणी निर्माण होतात. यात समन्वय साधने हे एक क्लिष्ट असे कार्य होते. हे कार्य समाशोधन गृहाच्या माध्यमातून केंद्रिय अधिकोषाकडे आले. सर्व

अधिकोषामध्ये समन्वय साधून या देण्याघेण्याकडे सुरळीतपणा आणणे हाही केंद्रिय अधिकोषाच्या उद्देशाचाच एक भाग होय.

**४) इतर अधिकोषास साहय :-**

अधिकोषन व्यवस्थेचा केंद्रबिंदू असे केंद्रिय अधिकोषाचे स्वरूप असल्यामुळे इतर अधिकोषांची व्यवस्था सुरक्षित राखणे आणि कठीण प्रसंगी त्यांना सहकार्य करणे हेही केंद्रिय अधिकोषाचे उद्देश होय.

**५) प्रत्यय नियंत्रण :-**

व्यापारी अधिकोष प्रत्ययाची निर्मिती करीत असतांना त्यात अतिरेक झाल्यास अर्थव्यवस्थेवर त्याचे दुष्परिणाम होतात. अशा वेळेला व्यापारी अधिकोषाच्या प्रत्यय निर्मितीवर नियंत्रण ठेवून देशी चलनाचे विदेशी चलनातील मुल्य स्थिर ठेवणे आणि अंतर्गत किंमत पातळीत संतुलन राखणे हा देखील केंद्रिय अधिकोषाच्या स्थापनेमागचा उद्देश होय.

वरील उद्दिष्टये दृष्टीसमोर ठेऊनच केंद्रिय अधिकोष आपली विविध कार्य पार पाडील असते.

## <u>केंद्रिय अधिकोषाची भुमिका (Role of Central Bank):–</u>

कोणत्याही अर्थव्यवस्थेमध्ये केंद्रिय अधिकोषाचे महत्व हे अत्यंत मोलाचे असते. कारण केंद्रिय अधिकोष म्हणजे अर्थव्यवस्थेची जणू महत्वपूर्ण नाडीच असते. म्हणूनच याकरीता डॉ. एम.डी. कान्ह म्हणतात की, केंद्रिय अधिकोष म्हणजे असा अधिकोष होय, “जो देशाच्या मौद्रिक संरचनेच्या शिखर स्थानी असतो आणि तो देशाच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने कार्य करीत असतो.

विकसनशील देशात नाणेबाजार संघटीत नसल्यामुळे तेथील बचती दरही कमी असल्याने भांडवल निर्मितीचा दरही कमीच असतो. शिवाय पतपुरवठयाची साधने देखील मर्यादित असतात. म्हणून राष्ट्राच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी **<u>केंद्रिय अधिकोषाची भुमिका</u>** महत्वपूर्ण असते.

**१) व्यापारी अधिकोषावर नियंत्रण :-**

देशातील विविध व्यापारी अधिकोषांवर नियंत्रण ठेवण्यासाठी जबाबदारीही केंद्रिय अधिकोष पार पाडीत असते. म्हणूनच तिला बॅकांची बॅक असे सुध्दा म्हटले जाते. केंद्रिय अधिकोषाच्या या महत्वपूर्ण स्थानामुळेच (Position) मौद्रिक धोरण अंमलात आणण्याची महत्वपूर्ण जबाबदारी केंद्रिय अधिकोष पार पाडीत असते.

**२) भांडवल निर्मितीस चालना :-**

विकसनशील देशातील लोकांची बचत करण्याची क्षमता कमी असते. परिणामत: अशा देशातील भांडवल निर्मितीचा दरही कमी असतो. केंद्रिय अधिकोष विविध मौद्रिक धोरण राबवून लोकांना बचतीकडे आकृष्ट करून भांडवल निर्मितीस चालना देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतो. त्यामुळे साहजिकच देशाच्या आर्थिक व औद्योगिक विकासालाही चालना मिळते.

### ३) देशाच्या सर्वांगिण आर्थिक विकासात मोलाची भूमिका :-

केंद्रिय अधिकोष आपल्या विविध जबाबदाऱ्या पार पाडीत असतांना देशाचा सर्वांगिण विकास कसा साधला जाईल या बाबतीतही अप्रत्यक्षपणे योगदान देत असते. कारण एकूणच आर्थिक व्यवस्था, नाणेबाजार, भांडवलनिर्मिती या सर्वामुळेच देशाच्या सर्वांगिण आर्थिक विकासाला चालना मिळत असते.

### ४) केंद्र सरकारला मार्गदर्शन :-

केंद्रिय अधिकोष हा सरकारचा अधिकोष म्हणूनही महत्वूर्ण भूमिका पार पाडीत असते. त्यामुळे केंद्र सरकारचा मार्गदर्शक व आर्थिक सल्लागार म्हणूनही जबाबदारी केंद्रिय अधिकोषाला पार पाडावी लागते. आर्थिक नियोजन, औद्योगिक धोरण, राजकोषीय धोरण, कर नीती इत्यादीसारख्या महत्वपूर्ण बाबींवरही केंद्रिय अधिकोष सरकारला मार्गदर्शन करीत असते.

### ५) चलन निर्मिती व व्याजदरावर नियंत्रण :-

देशाच्या एकूण चलन निर्मितीवर व व्याजदरावर नियंत्रण ठेवून त्यात सरकारच्या आर्थिक धोरणानुसार अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टीने जे बदल केले जातात किंवा जी कार्ये केली जातात त्यालाच मौद्रिक धोरण असे म्हटले जाते व हे कार्य देशाच्या केंद्रिय अधिकोषाकडेच असते. केंद्रिस अधिकोषाकडेच चलननिर्मिती एकाधिकार असतो. याचा वापर करून केंद्रिय अधिकोष अर्थव्यवस्थेमध्ये महत्वपूर्ण भुमिका पार पाडीत असते.

### ६) अर्थव्यवस्थेच्या विभिन्न घटकांमध्ये समन्वय राखणे :-

केंद्रिय अधिकोष अर्थव्यवस्थेतील विविध घटकांमध्ये व संस्थांमध्ये परिणामकारक समन्वय राखण्याची महत्त्वूर्ण जबाबदारी पार पाडीत असते. कारण अर्थव्यवस्थेतील हे घटक नेहमीच विस्कळीत व असंघटीत असतात. यात समन्वय राखला नाही तर अर्थव्यवस्थाच विस्कळीत होऊ शकते.

### ७) विदेशी चलनाचा योग्य उपयोग :-

केंद्रिय अधिकोष ही देशी व विदेशी चलनाचा एक अभिसारक या नात्याने जबाबदारी पार पाडीत असते. एवढेच नव्हे तर त्याच्या काटकसरीने आणि योग्य कारणासाठीच कसा उपयोग होईल याबाबतही सतर्क राहून आपली महत्त्वपूर्ण भुमिका पार पाडीत असतो.

### ८) नाणे बाजाराचे नियमन व नियंत्रण :-

विकसनशील देशांमध्ये नाणेबाजार पूर्णपणे विस्कळीत व असंघटीत असतो. नाणेबाजाराचे विविध परिणाम व प्रत्यय नियंत्रण करण्याची जबाबदारी केंद्रिय अधिकोषाचीच असते. त्यामुळे आर्थिक

विकासाला व औद्योगिकरणाला चालना देण्यासाठी नाणेबाजाराचे नियमन करणे व नियंत्रण करणे यचा सर्वस्वी एकाधिकार केंद्रिय अधिकोषाला असल्यामुळे अर्थव्यवस्थेत केंद्रिय अधिकोषाचे स्थान महत्वूर्ण असते.


### ९) किंमत पातळीत व विनिमय दरातील स्थैर्य :-

केंद्रिय अधिकोष आंतरराष्ट्रीय पातळीवर ज्याप्रमाणे विनिमय दर स्थिर राखण्याचा प्रयत्न करते त्याचप्रमाणे देशांतर्गत किंमत पातळी स्थिर राखणे तितकेच महत्वाचे असते. किंमतीमध्ये वारंवार उच्चावचने होत असल्यास अर्थव्यवस्थेवर त्याचा विपरीत परिणाम घडून येतो. म्हणून केंद्रिय अधिकोष आपल्या मौद्रिक धोरणातील विविध उद्दिष्टांचा वापर करून किंमत पातळी व विनिमय दरात स्थैर्य राखण्याचा सातत्याने प्रयत्न करीत असतो.

### १०) आर्थिक स्थैर्यात महत्त्वूर्ण भूमिका :-

विधिग्राहय मुद्रेचा विचार केला असता. अधिकोषांच्या प्रत्येय मुद्रेचा वापर सातत्याने वाढत असल्यामुळे या प्रत्यय निर्मितीवर नियंत्रण घालण्याचा समावेश मौद्रिक धोरणात होतो. तेव्हा केंद्रिय अधिकोष पतनियत्रंण धोरणाचा वापर करून आर्थिक स्थैर्य निर्माण करण्याचे महत्त्वूर्ण योगदान देत असते.

## केंद्रिय अधिकोषाची कार्यः—



# Lok Mahavidyalaya, Wardha  Session 2018-19
# Study Material
# Class – B.A. II (III semester)  Economics
# Sub :- Macro Economics

---

# ‘ से ’ चा बाजार नियम
# Says Law of Markets

---

प्रस्तावना :-

**‘ से ’** चा बाजारपेठेचा नियम हा एक अर्थशास्त्रीय नियम असून या नियमानुसार उत्पादन हा मागणीचा स्त्रोत होय. ‘ से ’ च्या नियमानुसार जेव्हा एखादा वैयक्तिक उत्पादक वस्तूइ किंवा सेवेचे उत्पादन करतो त्यावेळेला या उत्पादन कार्यासाठी तो खर्च करी असतो. त्यानंतर तो वस्तू व सेवेची मागणी निर्माण करण्याकरिता समर्थ होतो.

**प्रा. जे. व्ही. से** या अर्थशास्त्रज्ञाने बाजार नियमाचे प्रतिपादन केलेले आहे. काही अभिमतपंथी अर्थशास्त्रज्ञांनी या नियमांचे समर्थन करून आपल्या उत्पन्न आणि रोजगार सिद्धांताशी याची सांगड घालून **स्मिथ, रिकार्डो, जे. एस. मिल** आणि **पिगू** या सर्वांनी **‘ से ’** च्या बाजार नियमाचे समर्थन केले आहे.

**‘ से ’** चा नियम काही बाबतीत चुकीची माहिती देतो जसे पुरवठा हा स्वत: करीता मागणी निर्माण करतो. परंतु यात फारसे तथ्य नाही. कारण वस्तूचा एकूण पुरवठा हा मागणी बरोबर असेल तोपर्यंतच हे सत्य ठरते. परंतु मागणीपेक्षा जास्त उत्पादन झाल्यास म्हणजे पुरवठा जास्त झाल्यास तिला मागणी निर्माण करणे कठीण जाते. त्यालाच अतिउत्पादन व त्यातून सामान्य बेकारी अशी अवस्था निर्माण होते.

**‘ से ’ च्या बाजार नियमाची गृहीते :-**

१) पुरवठा स्वत:ची मागणी निर्माण करतो.

२) मजुरीचे दर, व्याज आणि किंमती या लवचिक असल्यामुळे आर्थिक प्रणालीत आपोआप समायोजन साधले जाते.

३) सरकारचा हस्तक्षेप नसतो.
४) मुद्रा हे विनिमयाचे माध्यम असते.
५) अतिउत्पादनाच्या संकल्पनेच्या विचार केलेला नाही.
६) हा दीर्घकालीन नियम आहे.
७) अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगारीची स्थिती असते.
८) बाजारपेठेत मुक्त प्रवेश आणि बर्हिमन असते.
९) मागणीच्या अभावाच्या संकल्पनेचा विचार नाही.

**‘ से ’ च्या बाजार नियमाचे महत्वाचे तत्थे:**

**१) बचत आणि गुंतवणूक सारखीच होते.**

साधारणत: उत्पन्न हे उपभोगावर खर्च केले जाते जेव्हा उत्पन्नातील काही रक्कम ही उपभोगावर खर्च केली जात नाही किंवा बचत केली जाते. अशा वेळेला अती उत्पादन निर्माण होते परंतु व्याजाचा दर हा उपभोक्ते आणि उत्पादक दोघांकरीताही बचत आणि गुंतवणूकी संबंधात निर्णय घेण्याकरिता महत्त्वाची भुमिका बजावीत असते, की किती प्रमाणात बचत करावयाची आणि किती प्रमाणात गुंतवणूक करावयाची हे व्याजाच्या दरावरच अवलंबून असते. मागणी आणि पुरवठयातील संबंध हा भांडवली स्वरुपाचा असून तो संतुलित राहील्यास बचत आणि गुंतवणूक ही संतुलित होऊन अतिउत्पादनाचा प्रश्न निर्माण होणार नाही.

**२) अति उत्पादन होत नाही.**

**‘ से ’** चा बाजार नियम असे विशद करतो की, तिथे सामान्य अतिउत्पादन होत नाही. जेव्हा उत्पादनाची पातळी वाढते तेव्हा उत्पन्न देखील वाढते. या वाढत्या उत्पन्नातून पुन्हा नविन मागणी निर्माण होते. म्हणजेच सर्वसामान्य अतिउत्पादन होत नाही. अल्पावधीतच अतिउत्पादन वाटतही असेल परंतु दीर्घकाळामध्ये हे उत्पादन समायोजित होत असल्यामुळे अतिउत्पादन राहत नाही.

**३) श्रम बाजार :-**

श्रमिक हे नेहमीच जास्त दराने मजुरीची मागणी करतात. या कारणानेच श्रमिकांची मागणी कमी होऊन बेरोजगारीत वाढ होते. मुक्त बाजार अर्थव्यवस्थेत मजुरीचा लवचिक दर असल्यास श्रमिंकांच्या मागणी आणि पुरवठयाच्या संतुलनाचे पूर्ण रोजगारीची स्थिती निर्माण होते.

**४) उत्पादन वस्तू करीता मागणी निर्माण करीत असते :-**

उत्पादन प्रक्रियेतून उत्पन्न मिळत असते हे उत्पन्न उत्पादकाकडे वितरीत होते. यातूनच ते कच्च्या मालाची खरेदी करतात आणि अशाप्रकारे पुरवठयातुनच त्याची मागणी तयार होते.

**५) विनिमय अर्थव्यवस्था**

**' से '** च्या नियमानुसार ही उत्तम विनिमय अर्थव्यवस्था होते, कारण स्वत:च्या उपभोगाकरीता वस्तूची निर्मिती होते किंवा त्या बदल्यात दुसऱ्या वस्तूची निर्मिती केली जाते. जेव्हा लोक आपल्या वस्तूच्या बदल्यात दुसरी वस्तू मागतात तेव्हा इतर वस्तूकरिता मागणी निर्माण होते.

हा नियम मौद्रिक अर्थव्यवस्थेकरीता देखील लागू होतो कारण मुद्रेच्या साहय्याने कोणत्याही वस्तू व सेवेची खरेदी करता येते. वस्तू उत्पादनातून मजुरी, व्याज, भाटक आणि लाभाच्या स्वरूपात उत्पन्नाची निर्मिती होते हेच उत्पन्न वस्तूच्या खरेदीवर उत्पादकाद्वारे खर्च केले जाते. यातून मागणी निर्माण होते. याचाच अर्थ जिथे उत्पादन आहे. तिथे उत्पन्न आहे आणि तिथे वस्तूकरीता मागणी आहे. म्हणजेच मौद्रिक अर्थव्यवस्थेत पुरवठा स्वत:करीता मागणी निर्माण करतो.

**' से ' च्या बाजार नियमाची अंमलबजावणी:**

नियमाची अंमलबजावणी पुढीलप्रमाणे

**१) स्वयं समायोजित यंत्रणा :**

'से' च्या बाजार नियमानुसार स्वयं समायोजित यंत्रणेमुळे विविध बाजारपेठामध्ये संतुलन साधले जाते. त्यामुळे असंतुलन जाणवत असले तरी ती तात्पुरती अवस्था असते. भांडवली बाजारात लवचिक व्याजदरामुळे बचत आणि गुंतवणूकीत समानता निर्माण होते, तसेच श्रम बाजारपेठेत श्रमिकांची मागणी आणि पुरवठा यातही व्याजदरात लवचिकता असल्यास समानता निर्माण होते तसेच श्रम बाजारपेठेत श्रमिकांची मागणी आणि पुरवठा यातही व्याजदरात लवचिकता असल्यास समानता निर्माण होते.

**२) अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगारी (Full employment in Economy):**

**'से'** च्या नियमानुसार अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगारीची स्थिती अस्तित्वात असते कारण उत्पादनातील वाढ म्हणजेच रोजगारीत वाढ आणि उत्पादनातील सातत्य म्हणजे पूर्ण रोजगारी होय आणि ही अवस्था म्हणजे उत्पादनाची कमाल मर्यादा होय.

**३) मुद्रेची तटस्थ भूमिका :**

'से' च्या बाजार नियमचा आधार हा वस्तूविनिमय प्रणाली असल्यामुळे वस्तूचा विनिमय वस्तूशी होतो. याठिकाणी असे गृहीत धरले आहे. की मुद्रा ही केवळ विनिमयाचे माध्यम आहे. त्यामुळे मुद्रेचा उत्पादन प्रक्रियेवर परिणाम होत नाही आणि मुद्रेची भूमिका तटस्थ राहाते.

**४) संसाधनाचा परिपूर्ण उपयोग :**

'से' चा बाजार नियम हा पूर्ण रोजगारीवर आधारीत आहे. यानुसार संसाधनांचा परिपूर्ण उपयोग आणि त्यामुळे उत्पादकांना जास्तीचे उत्पादन करून त्यातून जास्त उत्पन्नाची निर्मिती होते.

**५) अतिउत्पादन होत नाही.**

अति उत्पादन आणि बेरोजगी अस्तित्वात नाही. उत्पादनातील वाढही उत्पन्नाची निर्मिती करणे आणि आणखी उत्पादनाला प्रोत्साहीत करते.

**'से ' च्या बाजार नियमावर किन्स यांचा आक्षेप :**

'से ' च्या बाजार नियमावर प्रे. जे. एस. किंन्स यांनी आक्षेप घेतलेले आहेत, ते पुढीलप्रमाणे :-

**१) राज्याच्या हस्तक्षेपाची गरज :**

' से ' चा बाजारपेठेचा नियम हा मुक्त बाजार धोरणावर आधारीत आहे. परंतु प्रो. किन्स यांच्या मते अति उत्पादन आणि मोठया प्रमाणातील बेरोजगारीच्या वेळेला राज्याने राजकोषीय आणि मौद्रिक धोरणाचा अवलंब करण्याची गरज असते.

**२) बेरोजगारीची अवस्था :**

किन्स यांच्या मते, पूर्ण रोजगारी ही एक विशेष बाब आहे, कारण भांडवली अर्थव्यवस्थेत बेरोजगारीची अवस्था असते. भांडवली अर्थव्यवस्थेत 'से' च्या नियमानुसार पुरवठा नेहमीच मागणी पेक्षा जास्त असतो. त्यामुळे बरेचसे कामगार हे सद्यस्थितीत मजुरीवर काम करण्यास तयार असतात आणि बाकीचे बेरोजगार असतात.

**३) पुरवठा स्वत:ची मागणी निर्माण करीत नाही :**

'से' च्या बाजार नियमाच्या मते पुरवठा स्वत:ची मागणी निर्माण करतो. परंतु किन्स या विधानाशी सहमत नाही. प्रो. किन्स यांच्या मते आजच्या आधुनिक युगात उत्पादनाच्या वाढीबरोबर मागणीत वाढ होत नाही. उपभोक्त्याकरिता देखील वाढलेल्याच उत्पादनाचा उपभोग घ्यावा हे आजच्या अर्थव्यवस्थेत शक्य होत नाही.

**४) अतिउत्पादन होत नाही हेही लॉर्ड किन्स यांना मान्य नाही :**

उत्पादनाचे सर्व घटक वापरले गेले असे होत नाही. उत्पादनाचा काही भाग बचत केला जातो. हे निर्विवाद सत्य असले तरी ती सर्व बचत आपोआप गुंतवणूकीकडे वळविली जात नाही. त्यामुळे बचत आणि गुंतवणूक यात नेहमीच समानता राहू शकत नाही परिणामी अर्थव्यवस्थेत अतिउत्पादन आणि बेरोजगारीचा प्रश्न निर्माण होईलच.

**५) बचत व गुंतवणूकीत समानता :**

प्रो.किन्स 'से' च्या या मताशी सहमत नाहीत. कारण उपभोगावर खर्च झाल्यानंतर उर्वरीत रक्कमेची बचत होते. परंतु ही पूर्ण बचत गुंतवणूकीकडे वळती होत नाही कारण गुंतवणूक ही व्याजदरावर अवलंबून असते.

**६) मजुरी कपातीमुळे बेरोजगारी दूर होते :**

या 'से' यांच्या वक्व्यांशी पिगु हे सहमत आहेत. परंतु किन्स हे मजुरी कपात धोरणाशी सहमत नाही. त्यांच्या मते मजुरी कपातीमुळे सरासरी मागणीत तुट निर्माण होईल किंवा मागणी कमी होईल त्यामुळे बेरोजगारीत वाढत होईल. त्यामुळे ते मजुरी कपात धोरणाशी सहमत नाहीत.